क्र.जिआव्य/प्रशिक्षण/काति- 312 /२०१३
जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा
दिनांक :- ~~जानेवारी~~ 13 फेब्रुवारी, २०१३

# जाहिरात

## जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा

वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत वर्धा जिल्हयातील प्रत्येक आबादी गावात गावातील आपत्ती व्यवस्थापन समिती शोध व बचाव पथक सदस्यांचा आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण मंडळ स्तरावर आयोजित करण्याकरिता महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन ( MDRM) कार्यक्रमांतर्गत ह्या जाहिरातीव्दारे रु.५००/- प्रती गाव मर्यादेपर्यंत बंद लिफाफ्यात निविदा दिनांक 28/02/2013 रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडे शासकीय वेळेत सादर करण्याबाबत सुचना देण्यात येत आहे. प्राप्त निविदा शक्यतोवर त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता या जिल्हाधिकारी, वर्धा यांचे दालनात उघडण्यात येईल याबाबत सविस्तर माहिती (निविदा पत्रक अटी व शर्ती ) www.wardha.nic.in या संकेत स्थ्ळावर उपलब्ध आहे. उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त निविदेचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**टिप :- निविदा फॉर्म जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांच्याकडे विक्रीकरीता उपलब्ध आहे.**

जिल्हाधिकारी, वर्धा

प्रतिलिपी:

417

१. मा.विभागीय आयुक्त, नागपुर विभाग, नागपुर यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. जिल्हा माहिती अधिकारी वर्धा यांना माहिती तथा सदर जाहिरात जिल्ह्यात सर्वाधिक खप असलेल्या वृत्तपत्रात देऊन विनाविलंब प्रसिध्द करावी व प्रसिध्द केलेल्या वृत्तपत्राचे कात्रण या कार्यालयास सादर करावे.
३. जिल्हा विज्ञान व माहिती अधिकारी (NIC) यांना माहितीस्तव तथा सदरची जाहिरात जिल्ह्याचे वेबसाईडवर प्रसिध्द करावी.
४. जिल्हा नाझर, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांना माहिती तथा सदर जाहिरात कार्यालायचे नोटीस बोर्डवर लावुन प्रसिध्द करून अहवाल सादर करावा.
५. जिल्हा नाझर

जिल्हाधिकारी, वर्धा

अटी व शर्ती :-

१. प्रशिक्षण प्रात्यशिकासह घेणे आवश्यक .

२. प्रशिक्षण मंडळस्तरावर स्वत:आयोजित करुन संबंधीत मंडळाचे अंतर्गत येणा-या प्रत्येक आबादी गावातील आ.व्य. समिती शोध व बचाव पथक सदस्यांना प्रशिक्षण दयावे लागेल.

३. पुर व आग आपत्ती व्यवस्थापन, प्रथमोपचार, शोध व सुटका आणि गावस्तरिय आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा इ.विभिन्न विषयावर प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

४. प्रशिक्षण दरम्यान अल्पोपहार व चहा उपस्थितांना प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी निविदाधारकांची असेल.

५. प्रशिक्षण साहित्य /स्थळ व इतर सर्व व्यवस्था निविदाधारकांची असेल.

६. निविदाधारकास आ.व्य.प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचा अनुभव असावा.

७. निविदाधारकाकडे कमीत कमी ३ वर्षाचा प्रशिक्षण अनुभव असणारे किमान ४ प्रविण प्रशिक्षक (मास्टर ट्रेनर) चे पथक असावे व त्यांचा बायोडाटा निविदा सोबत जोडणे बंधनकारक आहे.

८. प्रशिक्षणादरम्यान सहभागी प्रशिक्षणाचा अवलंब करणे बंधनकारक असेल.

९. प्रशिक्षण अहवाल (छायाचित्र व वृत्तपत्र कात्रणासह) कार्यक्रमानंतर सात दिवसाचे आत सादर करणे बंधनकारक राहिल.

१०. संस्था नोंदणीकृत असल्याबाबतचे कागदपत्रे जोडावे.

११. निविदासोबत राष्ट्रीयकृत बँकेचा रु.५,०००/- धनाकर्ष (D D) जिल्हाधिकारी, वर्धा यांचे नावाने जोडणे आवश्यक राहिल.

१२. प्रशिक्षण कालावधीत होणा-या अपघात /नुकसान याची सर्व जबाबदारी निविदाधारकांची राहिल.

१३. प्रत्येक प्रशिक्षण कार्यशाळेची नोंद सक्षम अधिकारी यांचेकडे करुन त्यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

१४. आदेश दिल्यानंतर कार्यक्रमाची अमंलबजावणी करणे बंधनकारक राहिल.

१५. प्राप्त निविदापैकी कोणतीही निविदा स्विकृत वा रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, वर्धा यांना राहिल.

१६. सदर निविदा किंमत (रु.५००/-) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे उपलबधक राहिल.

१७. व्दि-लिफाफा पध्दतीती सादर करावी. १) (तांत्रिक मध्ये-अनुभव, प्रशिक्षक प्रोफाईल, नोंदणी प्रमाणपत्र, डी.डी.) २) दरपत्रक - यामध्ये प्रति गाव प्रशिक्षण दर नमुद करुन दोन्ही लिफाफे एका बंद निविदेसोबत सादर करवी.